

**Name :** V. Parthasarathy.

**Qualifications :**

B.Sc (Emergency & Trauma Care Technology) - S RMC, Chennai.

Post Graduate Diploma in Emergency Medical Services) - Symbiosis Institute of Health Sciences, Pune.

M.Sc (Trauma Care Management) - SRMC, Chennai.

**Designations :**

Emergency Paramedic - Deenanath Mangeshkar Hospital, Pune (2006 - 2007)

Clinical Instructor (Assistant Partner) GVK EMRI - Gujarat (2007 to 2013) & Tamilnadu (2013-2014)

Clinical Instructor (ETCT- Dept. of Emergency Medicine), SRMC (2014 to till date)

NSDC Instructor - EMT A & EMT B courses

AHA instructor - ACLS & BLS

ITLS Instructor

**Contribution in Development of EMS in India :**

Felicitated for his bravery, passion and dedication by President Abdul Kalam and Prime Minister Narendra Modi . Won the "Star of Life Award " given by Deenanath Mangeshkar Hospital, Pune .

**Anything you would like to say to Dr. Rajhans :**

"Thank You Dr Rajhans sir for providing me an opportunity to learn the real EMS experience and instilling the EMS knowledge with in me."

**Photos with Important Dignitary :**





# 'गाईडलाईन्स २००९' परिषदेचे उद्घाटन

## अतिदक्षता विभागातील तज्ज्ञ : भारतीय वैद्यकीय परिषदेचे सहकार्य

सकाळ वृत्तसेवा

पुणे, ता. २३ : "कामातील ताण दूर करणे, अहंभाव न बाळगणे, परस्पर संवाद आणि रुग्णांबद्दल सहानुभूती ही अतिदक्षता विभागातील यशस्वी कामाची चतुःसूत्री आहे," असे प्रतिपादन दीनानाथ मंगेशकर रुग्णालयाचे वैद्यकीय संचालक डॉ. धनंजय केळकर यांनी शनिवारी येथे केले.

मंगेशकर रुग्णालयातर्फे भारतीय वैद्यकीय परिषदेच्या सहकार्याने अतिदक्षता विभागातील डॉक्टरांसाठी 'गाईडलाईन्स २००९' ही दोनदिवसीय राष्ट्रीय परिषद भरविण्यात आली आहे. त्याचे उद्घाटन डॉ. केळकर यांच्या हस्ते करण्यात आले. त्या प्रसंगी ते बोलत होते. ब्रुसेल विद्यापीठाच्या अतिदक्षता विभागाचे प्रमुख डॉ. जॉन लुई व्हिन्सेंट आणि मंगेशकर रुग्णालयाच्या अतिदक्षता विभागाचे प्रमुख डॉ. प्रसाद राजहंस उपस्थित होते.



**दीनानाथ मंगेशकर रुग्णालय : अहमदाबाद येथील बॉंबस्फोटात जखमी होऊनही इतर जखमींना वैद्यकीय सेवा देणाऱ्या डॉ. पार्थसारथी यांचा डॉ. जॉन लुई व्हिन्सेंट यांच्या हस्ते मानपत्र देऊन शनिवारी गौरव करण्यात आला. त्या प्रसंगी (डावीकडून) डॉ. प्रसाद राजहंस, डॉ. व्हिन्सेंट आणि डॉ. धनंजय केळकर.**

डॉ. केळकर म्हणाले, "अतिदक्षता विभागात डॉक्टरांवरही ताण असतो. चांगली रुग्णसेवा देण्यासाठी डॉक्टरांनी तणावमुक्त झाले पाहिजे. तेथे अनेक विशेषज्ञांच्या सेवांची आवश्यकता असते. हे सांघिक काम असते. त्यामुळे डॉक्टरांमध्ये संवाद होणे गरजेचे आहे." डॉ. राजहंस म्हणाले, "या परिषदेच्या माध्यमातून या क्षेत्रातील अद्ययावत ज्ञान वैद्यकीय तज्ज्ञांपर्यंत पोचविता येते."

आपत्कालीन वैद्यकीय सेवेसाठी उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल डॉ. व्ही. पार्थसारथी यांचा डॉ. व्हिन्सेंट यांच्या हस्ते या वेळी गौरव करण्यात आला. गेल्या वर्षी २६ जुलैला अहमदाबाद येथे झालेल्या बॉंबस्फोट मालिकेतील रुग्णांना जिल्हा रुग्णालयात वैद्यकीय सेवा देतानाच रुग्णालयात आणखी एक बॉंबस्फोट करण्यात आला. त्यात डॉ. पार्थसारथी यांना पाय गमवावे लागले. या अवस्थेतही त्यांनी एका जखमीला स्वतःचा जीव धोक्यात घालून उपचार केले. याबद्दल त्यांचा सन्मानपत्र देऊन गौरव करण्यात आला.